**जाबदार क्रं.३ तर्फे श्री.डी.एल.घोगरे वकिल यांच्यामार्फत उर्वरीत सरतपास शपथेवर सुरु.**

**११.** अर्जदार माझ्यापेक्षा वयाने जेष्ठ आहे. ती सध्या रामतीर्थ ता.लोहा जि. नांदेड येथे राहते. माझे आणि त्यांचे बोलणे आहे. ती माझी सखी बहीण आहे हे खरे आहे. ती माझ्याकडे येत-जात असते. दोन वर्षांपूर्वी माझे चुलते माणिकराव मयत झाले होते त्यावेळी ती मला भेटली होती. हे खरे की, तिची तब्येत चांगली आहे. हे खरे की, ती हिंडून फिरुन असून सर्व व्यवहार करते. ती कोर्टात साक्षीला येऊ शकते याबद्दल मला माहिती नाही. कोंडाबाई माझ्याकडे अहमदपूर येथे राहते. अहमदपूर येथे मी १४ वर्षांपूर्वी घर बांधले तेव्हापासून ती माझ्यासोबत राहते. कोंडाबाई या हिंडून फिरुन आहेत. हे खरे की, ती स्वत:च्या हाताने जेवण खाते. कोंडाबाईच्या अधिकारपत्रामध्ये मला चालता फिरता येत नाही असा उल्लेख का आहे हे मला सांगता येते. मी एम.ए.बी.एड असून शिक्षक आहे. एखादया दस्तात खोटा मजकूर लिहीला तर तो शिक्षापात्र गुन्हा आहे हे मला माहिती नाही. हे खरे नाही की, कोंडाबाईने न्यायालयात साक्ष दिली तर खरी परिस्थीती बाहेर येईल म्हणून मी ते खोटे अधिकारपत्र करुन घेतले.

**१२.** जाबदार क्रं. ३ केशव याच्या आईचे नाव हरीबाई आहे. त्यांच्या वडीलांचे नाव दत्तात्रय आहे. हे खरे की, त्यांना दत्ताही म्हणत. हे मला माहिती नाही की, दत्तात्रय व हरीबाई यांना एकमेव उत्तराधिकारी जाबदार क्रं. ३ आहे. दत्तात्रय व हरीबाई यांचा विवाह कधी झाला हे मला माहिती नाही. दत्ता उर्फ दत्तात्रय यांचा कोंडाबाई यांच्याशी विवाह कोंडाबाईच्या वयाच्या १० व्या वर्षी झाला. सदर बाब मला कोंडाबाई या माझ्या आईने सांगितली. सदर बाब ती मला सतत सांगत असते. असे ती मला का सांगते याचे कारण की, हे वाद सुरु झाल्यामुळे ती सांगते. कोवीडच्या काळात सदर वाद सुरु झाले. वाद का झाला हे मला माहिती नाही.

**१३.** कोंडाबाई व दत्तात्रय यांच्या विवाहानंतर त्यांना पहिले अपत्य ५-६ वर्षांनी झाले. ते अपत्य मयत झाले. मयत अपत्याचे नाव गिरीजाबाई होते. दुसरे अपत्य कधी झाले हे मला माहिती नाही. दि.१०/०९/१९७३ ही माझी जन्मतारीख आहे. याचा पुरावा माझ्याकडे आहे. तो मी दाखल करु शकतो. हे खरे की, अर्जदार अन्नपुर्णा हिचे नावही गिरीजा आहे. तिचे शिक्षण कुठे झाले हे मला माहिती नाही. तिचे शिक्षण झाले की नाही हे मला माहिती नाही. शेलदरा या माझ्या गावात जिल्हा परिषद आहे. हे खरे की, मुल शाळेत दाखल होतेवेळी त्याची जन्मतारीख नोंदवली जाते. आता मला निशाणी क्रं.५१ हा निर्गम उतारा दाखविला. अर्जदार ही माझी बहीण आहे. निशाणी क्रं. ५१ हा निर्गम उतारा अर्जदाराचाच आहे.

**१४.** हरीबाई व दत्तात्रय यांना विवाहानंतर पहिले अपत्य कधी झाले हे मला माहिती नाही. हरीबाई व दत्तात्रय यांना एकच अपत्य आहे. त्याचा जन्म कधी झाला हे मला माहिती नाही. त्या अपत्याचे नाव केशव आहे. केशवचे शिक्षण झाले की नाही हे मला माहिती नाही. लहानपणापासून मी, माझी आई, केशव व अर्जदार असे आम्ही एकाच घरात राहत होतो. शाळेला जाणे, एकमेकांना सहकार्य करणे असे मी , केशव व अर्जदार करीत असे हे खरे आहे. मी त्यांच्या जन्मनोंदी व संबंधीत कागदपत्रे काढलेली नाहीत. माझा शाळा प्रवेश माझ्या वडीलांनी केला. केशवचे शिक्षण शेलद-यात जिल्हा परिषद शाळेत झाले हे खरे आहे. त्याची जन्मतारीखेची नोंद आमच्या वडीलांनी केली याबद्दल मला माहिती नाही. केशवचा जन्म दि.०५/०८/१९६० रोजीचा आहे याबद्दल मला माहिती नाही. हरीबाई व दत्तात्रय यांचा विवाह सन १९५४ मध्ये झाला हे खरे नाही. हिंदू जाती विवाह रुढी प्रमाणे सप्तपदी होऊन हा विवाह झाला हे मला माहिती नाही. त्यानंतर केशवचा जन्म झाला हे मला माहिती नाही. हे खरे नाही की, हरीबाई ही दत्तात्रयची पहिली पत्नी आहे. हे खरे नाहीकी, पहिली पत्नी हयात असताना दत्तात्रयनी जाबदार क्रं. १ शी १९५९ साली बेकायदेशीरपणे दुसरा विवाह केला. १९६४ साली दत्तात्रय यांनी विजयाबाई यांच्याशी बेकायदेशीर तिसरा विवाह केला हे मला माहिती नाही. हे खरे की, विजयाबाई व दत्तात्रय यांना कोणतेही अपत्य नाही. हे खरे की, २०१६

मध्ये हरीबाई मयत झाली. दत्तात्रय सन २००३ मध्ये मयत झाले. विजयाबाई सन २०२० मध्ये शेलदरा येथे मयत झाल्या हे खरे आहे. विजयाबाईचे माहेर जगळपुर ता.अहमदपूर सध्याचा जळकोट तालुका हे आहे. त्यांना बहीण भाऊ आहेत हे खरे आहे. विजयाबाईचे आईवडील मयत आहेत. तिच्या चौघा भावांपैकी एकजण मयत आहे. विजयाबाईला ३ बहीणी आहेत. त्यातील एक मयत आहे. मला आई वडील व माझी आजी यांनी सांगितल्यामुळे हरीबाई ही त्यांची दुसरी पत्नी आहे असे मी सांगतो. हे खरे की, हरीबाई व कोंडाबाई यांचा दत्तात्रयसोबत झालेला विवाह मी पाहिला नाही. माझे शेलद-यात मतदान आहे. हे खरे की, निशाणी ६२ मध्ये मतदा-यांच्या नोंदी आहेत. त्यामध्ये पान क्रं.३२६ वर हरीबाई, कोंडाबाई व विजयाबाई यांच्या नोंदी आहेत हे खरे आहे. सन २०१७ साली मी अहमदपूर येथे राहत होतो. मला निवडणूक डयुटी असल्याने मी पोस्टाने मतदान करतो. मी चार-पाच वेळा पोस्टाने मतदान केले असावे. २००३ सालची मतदारयादी मी दाखल केली आहे. नि.क्रं.७० ही मतदारयादी मी दाखल केली. ती बरोबर आहे. त्यातील मजकूराबद्दल मी सांगू शकत नाही. त्यातील हरीबाईचे वय ६१ व कोंडाबाईचे वय ५९ दाखविले आहे याबद्दल मला माहिती नाही. मतदारयादीत क्रम वरखाली असल्याने पहिली पत्नी कोंडाबाई आहे हा माझा भ्रम आहे हे खरे नाही. या नोंदीबद्दलची मला काही माहिती नाही. निशाणी क्रं.७१ मधील रेशनकार्डात नमूद मीरा ही केशवची मुलगी आहे, ज्ञानराज हा त्याचा मुलगा आहे. गंगाबाई ही त्याची पत्नी व विठाबाई ही त्याची मुलगी आहे. या रेशनकार्डात माझ्या पत्नीचे, मुलांचे नाव नाही. रेशनकार्डावर अन्नपूर्णाचे नाव नाही हे खरे आहे. कोंडाबाई व हरीबाई यांच्या या रेशनकार्डावरील वयाच्या नोंदीबद्दल मला वैयक्तीक माहिती नाही. या वयाच्या नोंदी चुकीच्या आहेत याबद्दल मला माहिती नाही. या रेशनकार्डावर खाडाखोड आहे हे खरे आहे. हे रेशनकार्ड माझ्या ताब्यात केशवकडून आले. केशवने ते मला कधी दिले हे मला सांगता येत नाही. निशाणी ७३ या जनगणना यादीत पूर्ण नावे नमूद नाहीत हे खरे आहे. यादी मिळण्यासाठी अर्ज कधी केला याची तारीख त्या कागदावर नमूद आहे. तो अर्ज मी जळकोट तहसील कचेरीत

केला. हे खरे की, १९५१ साली जळकोट तालुका अस्तीत्वात नव्हता. सदर अभिलेख जळकोट कार्यालयात उपलब्ध नाहीत हे म्हणणे खरे नाही. हे खरे नाही जनगणना यादी खोटी आहे. हे खरे नाही की या यादीचा या प्रकरणाशी संबंध नाही. एखादया व्यक्तीचे पूर्ण नाव नसेल तर ती तिच व्यक्ती आहे असे म्हणता येत नाही, याबद्दल मला सांगता येणार नाही.

**१५.** मी व माझी बहीण हरीबाई व विजयाबाई यांचे वारस नाहीत हे खरे आहे. माझी व शेळके वकीलांची मी उलटतपास देण्यापूर्वी भेट झाली नाही. माझ्या म्हणण्यातील मजकूर मला मान्य आहे. त्यात अर्जदाराचा अर्ज नामंजूर करावा असे नमूद आहे हे खरे आहे. शेळके वकीलांच्या उलटतपासात मी अर्ज मंजूर करायला हरकत नाही असे गोंधळल्याने उत्तर दिले. हे खरे की, शेळके वकीलांनी घेतलेल्या उलटतपासणीच्या वेळी मी गोंधळलो होतो. अन्नपूर्णा ही हरीबाई किंवा विजयाबाईची वारस नाही असा उल्लेख सरतपासात व म्हणण्यात आहे हे खरे आहे. हे खरे नाही की, शेळके वकीलांनी घेतलेला उलटपास मी चुकीचा व संगनमताने दिलेला आहे. हे खरे की, अर्जदार व माझे संगनमत आहे. हरीबाई ही दत्तात्रयची पहिली पत्नी असून जाबदार क्रं. ३ हा त्यांचा एकमेव उत्तराधिकारी आहे हे खरे नाही. कोंडाबाई ही दुसरी पत्नी असल्याने मी त्यांचा कायदेशीर वारस नाही हे खरे नाही. हे खरे नाही की, अर्जदार व मी दत्तात्रयचे अनौरस वारस आहोत. दत्तात्रयची मालमत्ता आजही दत्तात्रयाच्या नावे अभिलेखांना आहे हे खरे आहे. शेतजमीन, घरमिळकत तसेच विजयाबाईच्या नावे दोन जमीनी आहेत अशी मालमत्ता आहे. विजयाबाईला जमीन कोणत्याआधारे मिळाली हे मला माहिती नाही. मात्र ती वडीलोपार्जित मिळकत आहे. दत्तात्रयने विजयाबाईला कशाच्या आधारे मिळकत कशी हस्तांतरीत केली यास माझे सांगणे त्यांनी खरेदीपत्र करुन दिले. या खरेदीपत्राला आम्ही उजर घेतलेला नाही. कोंडाबाई व दत्तात्रयचे वारस आहोत असे ठरवून घ्यावे असे मला वाटले मात्र तोपर्यंतच हा अर्ज दाखल झाला. केशव व माझ्यामध्ये मालमत्तेवरुन वाद आहे. मी गावी राहत नाही हे खरे आहे. गावातील घरात निम्या भागात केशव राहतो. हे खरे नाही की, दत्तात्रयच्या सगळया

मिळकतींवर केशवचा ताबा आहे. खोटे वारसप्रमाणपत्र घेऊन दत्तात्रयच्या नावे असलेली व केशवच्या ताबयता असलेलीमिळकत हडप करता यावी म्हणून मी व अर्जदारने संगनमताने हा अर्ज केला हे खरे नाही. दत्तात्रयची अनौरस अपत्य म्हणून मी व अर्जदार असल्याने आम्हांला त्याच्या मिळकतीत अधिकार नाही हे खरे नाही. अर्जदार व जाबदार क्रं. ३ यांचेच संगनमत आहे असे माझे म्हणणे आहे. सन २००३ पासून ते आजपर्यंत वाटणीचा दावा करावा असे मला वाटले की नाही यास माझे सांगणे की, तसे मला वाटले होते , परंतू हा अर्ज दाखल झाला. हे खरे नाही की, माझा जबाब खोटा आहे. हे खरे नाही की, माझे आई थोरली असल्याचे मी खोटे सांगतो. हे खरे नाही की, मी खोटी साक्ष देतो.

**उलटतपास पुर्ण.** **श्रवणोत्तर स्विकृत**
**फेरतपास नाही.** समक्ष

**स्वाक्षरीत/-**
**( एस.एन.सरडे )**
**दिनांक १६/०१/२०२६.** **दिवाणी न्यायाधीश व.स्तर, अहमदपूर.**